**शासकीय/ निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांना कंत्राटदार नोंदणीसाठी / निविदा प्रक्रियेत अनुभवाचे प्रमाणपत्र व यंत्रसामुग्री वार्षिक उलाढाल,(Bid capacity) तत्सम कामे, बाबीचे पात्रता परिमाण, सनदी लेखापालाकडून प्रमाणित लेखापरीक्षण याबाबत सुधारीत नियम.**

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०२१/प्र.क्र.९५ / इमारती.२**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०००३२

दिनांक : १६ नोव्हेंबर, २०२१

**वाचा :-** १) शासन निर्णय,सा.बां.विभाग क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.१२१/इमा.२ दि.५ जानेवारी २०१९.

२) शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.१२१/इमा.२ दि.१३ जुलै २०२१.

**प्रस्तावना :-**

शासकीय/निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अभियंत्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा व प्रशासकीय अनुभवाचा शासनास लाभ व्हावा या हेतूने, सेवानिवृत्त अभियंत्यांना कंत्राटदार म्हणून नोंदणी व नोंदणी प्रक्रियेत काही सवलती देण्याच्या उद्देशाने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासन निर्णय दि. ०५.०१.२०१९ व शासन शुध्दीपत्रक दि.१३ जुलै, २०२१ निर्गमित करण्यात आले आहेत. दरम्यानच्या काळात वेळोवेळी कंत्राटदार नोंदणीच्या नियमांमध्ये बदल करण्यात आलेले आहेत. निविदा प्रक्रियेमध्ये हातातील कामे (Work in Hand), पूर्ण झालेली कामे (Work Done), बीड कॅपॅसीटी (Bid Capacity), सनदी लेखापालांकडून प्रमाणित लेखा परिक्षण ताळेबंद, अतिरिक्त सुरक्षा रक्कम (Additional Performance Certificate) इ. बाबी स्पष्टता नसल्याने प्रचलित नियमानुसार निविदा प्रक्रियेमध्ये सहभागास अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच वाढत्या महागाईच्या काळात बांधकाम साहित्य व इतर साहित्य/मजूर यांचे दर वाढल्यामुळे कामाच्या निविदा सादर करण्यासाठी विद्यमान आर्थिक व कालावधी ची मर्यादा वाढविणेसाठी सुधारणा करण्याची आवश्यकता होती. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणा-या अभियंत्यांचा तांत्रिक ज्ञानाचा व प्रशासकीय अनुभवाचा लाभ शासनास व्हावा म्हणून अधिक सुधारणा करणे या हेतूने, सद्य परिस्थितीत शासकीय/निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अभियंत्यांना कंत्राटदार म्हणून नोंदणी / निविदा प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत

आहे. त्या अनुषंगाने शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांना कंत्राटदार नोंदणीसाठी यापूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत असून खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१. कार्यकारी अभियंता पदापेक्षा निम्न पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना रु.९० लक्ष रकमेपर्यंत व विदयुत अभियंत्यांना रु.१० लक्ष रकमेपर्यंत नोंदणी देण्यात यावी. या नोंदणीकरणाची सवलत, नोंदणी दिनांकापासून १० वर्षे राहील.

२. कार्यकारी अभियंता व त्यापेक्षा उच्च पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना रु.१५० लक्ष रक्कमेसाठी व विदयुत अभियंत्यांना रु.२५ लक्ष रकमेपर्यंत नोंदणी देण्यात यावी. या नोंदणीकरणाची सवलत, नोंदणी दिनांकापासून १० वर्षे राहील.

३. सेवानिवृत्त अभियंत्यांना कंत्राटदार म्हणून नोंदणी करतांना त्यांना शासनाकडून / सक्षम प्राधिका-याकडून ना-देय/ ना-चौकशी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

४. सेवानिवृत्त अभियंता कंत्राटदार यांना नोंदणीसाठी वार्षिक उलाढाल, सनदी लेखापालाकडून लेखापरीक्षण ताळेबंद, पतधारी प्रमाणपत्र (Solvency Certificate), यंत्रसामुग्री, पूर्ण झालेली कामे (Work Done) तसेच हातातील कामे (Works in Hand) यामधून सूट देण्यात येत आहे. सदर सूट नोंदणी दिनांकापासून १० वर्षापर्यंत देण्यात येत आहे.

५. नविन नोंदणीकृत तसेच यापुर्वी नोंदणी झालेले सेवानिवृत्त अभियंता कंत्राटदार यांना निविदा प्रक्रियेसाठी हातातील कामे (Work in Hand),पूर्ण झालेली कामे (Work Done), बीड कॅपॅसीटी (Bid Capacity), तत्सम कामे (similar works), बाबीचे पात्रता परिमाण (qualification Quantity) सनदी लेखापालांकडून प्रमाणित लेखा परिक्षण, ताळेबंद, वार्षिक उलाढाल, यंत्रसामुग्री इ. बाबी संबंधी निविदा पात्रता निकषांमध्ये (Qualifying Criteria) नोंदणी झाल्यापासून ७ वर्ष कालावधीसाठी सुट देण्यात येत आहे. तसेच सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) व पतधारी प्रमाणपत्र (Solvency Certificate) इत्यादी बाबींचे नियम इतर कंत्राटदारांप्रमाणे लागू राहतील. तसेच ७ वर्षातील एकुण कामाच्या किंमतीची अट राहणार नाही.

६. नोंदणीकृत सेवानिवृत्त अभियंता कंत्राटदार यांना निविदा प्रक्रियेसाठी भरावयास लागणारी एकुण अतिरिक्त सुरक्षा रक्कम (Additional Performance Security Deposit) व इसारा रक्कम भरण्यापासून ५०% सुट देण्यात येत आहे.

७. शासकीय कर्मचा-याने सेवानिवृत्तीच्या शेवटच्या वर्षभरात ज्या विभागात काम केले आहे त्या विभागात सेवानिवृत्तीनंतर एक वर्षाच्या कालावधीसाठी निविदा भरता येणार नाही.

८. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा व प्रशासकीय अनुभवाचा लाभ शासनास अखंडीत व्हावा या हेतूने नोंदणी नुतणीकरणाची ३ वर्षांची अट शिथिल करुन नोंदणी नुतणीकरणा पासून सुट देण्यात येत आहे.

९. सेवानिवृत्त नोंदणीकृत स्थापत्य अभियंता कंत्राटदार यांना फर्निचर व तत्सम कामासाठी लागणारी आय नोंदणी प्रमाणपत्राबाबत सूट देण्यात येत आहे तसेच नैसर्गिक आपत्ती व साथीच्या रोगासंबंधी अनुषंगिक कामे करण्यास सेवानिवृत्त्त अभियंता कंत्राटदार पात्र राहतील.

१०. सेवानिवृत्त अभियंता यांना सदरील सूट ही सेवानिवृत्तीनंतर/राजीनाम्यानंतर ५ वर्षाच्या आत अर्ज केल्यास मिळू शकेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१११६१६३५०३७५१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SACHIN MANIKRAO CHIVATE

Digitally signed by SACHIN MANIKRAO CHIVATE
DN: CN = SACHIN MANIKRAO CHIVATE, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = PUBLIC WORKS DEPARTMENT
Date: 2021.11.16 16:39:24 +05'30'

**( सचिन चिवटे )**

**अवर सचिव (इमारती), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री (सा. बां.) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा. राज्यमंत्री (सा. बां.) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा. सचिव (रस्ते), यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
४. मा. सचिव (बांधकामे), यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

५. मा. सचिव (रा.म), कोकणभवन नवी मुंबई.
६. मुख्य अभियंता व सहसचिव यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७. अधीक्षक अभियंता,(पुल / इमारती) संकल्पचित्र मंडळ, नवी मुंबई.
८. सर्व मुख्य अभियंता, सर्व अधीक्षक अभियंता,
९. सर्व कार्यकारी अभियंता, (जिल्हा परिषदासह)
१०. निवडनस्ती